६०१

विशेष मागास प्रवर्गाकरिता पदोन्नतीमध्ये आरक्षण

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक – बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16ब,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक :– 26 जुलै, 1995.

पहा:– 1) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16ब, दिनांक 8 डिसेंबर 1994.
2) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 2 जानेवारी, 1995.
3) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.सीबीसी–1494/प्रक्र.236/मावक–5, दिनांक 7 डिसेंबर, 1994.
4) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.सीबीसी–1494/प्र.क्र.236/मावक–5 दिनांक 13 जून, 1995.
5) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995.

शासन निर्णय:– शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक–बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995 अन्वये समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने घोषित केलेल्या "विशेष मागास प्रवर्गासाठी शासकीय, निमशासकीय सेवेत सरळ सेवा तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यास अनुसरून सरळ सेवा भरतीची 200 बिंदू नामावली, त्याचप्रमाणे पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीमध्ये सुधारणा करणे अनिवार्य आहे. त्यादृष्टीने 200 बिंदू नामावली सुधारित स्वरुपात निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

पदोन्नतीसाठी पूर्वीची 50 बिंदू नामावली शासन निर्णय क्र.बीसीसी–1092/1692/प्र.क्र.154/16ब, दिनांक 4 ऑगस्ट, 1992 अन्वये विहित करण्यात आली आहे. या बिंदू नामावलीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी आरक्षण ठरविण्यात आले आहे. आता नव्याने निर्माण केलेल्या विशेष मागास प्रवर्गास 2% इतके आरक्षण सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये दिले असल्याने पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीतील एक बिंदू सदर विशेष मागास प्रवर्गासाठी राखविणे आवश्यक आहे. पूर्वीच्या 50 बिंदू नामावलीत सुधारणा करुन त्यात विशेष प्रवर्गासाठी 2% इतके आरक्षण म्हणजे 50 बिंदू मध्ये एक बिंदू, बिंदू क्र.10 वर दर्शवून सुधारित बिंदू नामावली सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आली आहे. ही बिंदू नामावली दिनांक 13 जून, 1995 पासून अंमलात येईल.

सर्व शासकीय कार्यालयांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी आणि तदनुसार कार्यवाही करावी. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कळवावेत तसेच निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादि आस्थापनांमध्ये हे आदेश लागू करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी निर्गमित करावेत. या संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांच्या प्रती या विभागासही पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सि. म. हिरोजनेर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

६३०

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय
27 SEP 1995

## नमुनेवजा नामावली (50 बिंदू रोस्टर)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुली |
| 2. | खुली | 27. | विजाभज (अ/ब) |
| 3. | खुली | 28. | खुली |
| 4. | अनुसूचित जमाती | 29. | खुली |
| 5. | खुली | 30. | खुली |
| 6. | खुली | 31. | अनु. जमाती |
| 7. | विजाभज (अ/ब) | 32. | खुली |
| 8. | खुली | 33. | खुली |
| 9. | खुली | 34. | खुली |
| 10. | विशेष मागासप्रवर्ग | 35. | अनु. जाती |
| 11. | खुली | 36. | खुली |
| 12. | खुली | 37. | खुली |
| 13. | अनु. जाती | 38. | खुली |
| 14. | खुली | 39. | अनु. जाती |
| 15. | खुली | 40. | खुली |
| 16. | अनु. जमाती | 41. | खुली |
| 17. | खुली | 42. | खुली |
| 18. | खुली | 43. | अनु. जमाती |
| 19. | अनु. जाती | 44. | खुली |
| 20. | खुली | 45. | खुली |
| 21. | खुली | 46. | खुली |
| 22. | खुली | 47. | अनु. जाती |
| 23. | अनु. जाती | 48. | खुली |
| 24. | खुली | 49. | खुली |
| 25. | खुली | 50. | विमुक्त जाती व भटक्या जमाती (अ/ब) |

| | |
|---|---|
| अनु. जाती | 7 |
| अनु. जमाती | 4 |
| विजाभज. (अ/ब) | 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| राखीव पदांची संख्या | 15 |
| खुल्या पदांची संख्या | 35 |

एच-710(ए)(5000-8-95)2